N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** तासगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0068 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/02/2025 13:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 11/02/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/02/2025

**Time From (वेळेपासून):** 15:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/02/2025 **Time (वेळ):** 13:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/02/2025 13:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ।तहसिल कार्यालय , तासगाव ,तासगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अर्जुन पांडुरंग पोळ

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** पांडुरंग पोळ

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राजापूर,तासगाव ,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राजापूर,तासगाव ,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9022592921

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुजाता आण्णाप्पा जाधव | | पती का नाम : आण्णाप्पा जाधव | 1. राजापूर ,तासगाव ,तासगांव, सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 15.02.2025

मी अर्जुन पांडुरंग पोळ, वय 39 वर्ष, व्यवसाय:- नोकरी, कॉन्स्टेबल, बक्कल नंबर 090370137, आय.टी. बी.पी. 53 बटालियन, नारायणपुर, राज्य छत्तीसगड, मुळ रा. राजापूर ता. तासगाव जि. सांगली. मो.नं. 9022592921

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासमवेत राहणेस आहे. मी दि.03.02.2025 रोजी राजापूर गावामधील गट नं. 816 मधील 39 गुंठे क्षेत्र शेतजमिन माझा भाऊ कृष्णा पांडुरंग पोळ यांचेकडून दुय्यम निबंधक कार्यालय तासगाव येथे खरेदी दस्ताव्दारे खरेदी केलेली आहे. त्यानंतर मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी नोंद होणेसाठी अर्ज व कागदपत्रे दि.04.02.2025 रोजी तलाठी कार्यालय राजापूर येथे जावून तेथील तलाठी कार्यालयातील काम करणारा खाजगी इसम दादासो कोळी ऊर्फ पिंटू यांचेकडे दिलेली होती. मी दिलेली नोंदी संदर्भाची कागदपत्रे तलाठी मॅडम यांचेकडे देतो असे कोळी यांनी मला सांगीतले.

त्यानंतर दि.11.02.2025 रोजी मी माझे नोंदी संदर्भातील कामाकरीता तलाठी कार्यालय राजापूर येथे जावून तलाठी कार्यालयातील काम करणारा खाजगी इसम कोळी यांची भेट घेतली असता त्यांनी मला तलाठी श्रीमती जाधव यांची तहसिल कार्यालय तासगाव येथे जावून भेट घेण्यास सांगितले. त्यावेळी मी कोळी यांना तलाठी मॅडम यांची भेट घालून देणेची विनंती केली असता त्यांनी भेट घालून देतो असे सांगितले. त्यानंतर मी व कोळी असे तहसिल कार्यालय तासगाव येथे सकाळी 11.00 वाजताचे सुमारास गेलो. त्यावेळी कोळी यांनी माझी तलाठी श्रीमती जाधव यांची भेट घालून दिली. त्यावेळी मी तासगाव तहसील कार्यालयातील निवडणुक शाखेच्या समोरील पॅसेजमध्ये तलाठी श्रीमती जाधव यांचेशी माझे नोंदीबाबत चर्चा करून त्यांना नोंद लवकर घालून देण्याची विनंती केली. त्यावेळी तलाठी श्रीमती जाधव यांनी माझी नोंद घालून देण्यासाठी माझेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझी नोंद घालून देणेची विनंती केली असता पैसे दिल्याशिवाय नोंद घालून देणार नसल्याचे सांगितले.

मला तलाठी श्रीमती सुजाता जाधव यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 11.02.2025 रोजी पोलीस उप अधीक्षक, श्री. पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून माझी तलाठी श्रीमती जाधव, यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून माझी तक्रार तासगाव येथे येवून घेणेची विनंती केली. त्यावेळी पाटील साहेब यांनी आम्ही तासगाव येथे आलेनंतर मला संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी 14.20 वा चे सुमारास मला संपर्क करून वसंतदादा कॉलेज तासगाव येथे येण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील युनिकॉर्न मो.सा.क्र.एमएच 10 ईसी 5387 वरून जावून पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर आम्ही तासगाव ते मणेराजुरी जाणारे रोडने काही अंतरावर असले श्री.लक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था चे समोरील रोडलगत दाखल झालो.

त्यावेळी पाटील साहेब यांनी माझी व पोलीस निरीक्षक श्री. विनायक भिलारे साहेब यांची ओळख करून देवून माझे तक्रारीची पुढील कार्यवाही भिलारे साहेब हे करतील असे सांगितले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे माहिती सांगून माझा लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तलाठी श्रीमती जाधव यांचेविरूध्दचा लाच मागणीचा लेखी तक्रारी अर्ज भिलारे साहेबांसमक्ष हजर केला. भिलारे साहेब यांनी माझे तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख दिली. भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. राजू लोटू पवार यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. समीर अब्दुलगणी बागवान यांनी पंच नं. 2 यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचांनी वाचून मी तोंडी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याची खात्री झालेनंतर दोन्ही पंचांनी तक्रारी अर्जावर



Scanned with OKEN Scanner

सहया केल्या.

मी दिले लाच मागणीचे तक्रारी अर्जाप्रमाणे भिलारे साहेब यांनी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे तलाठी श्रीमती जाधव यांचेक्डे पडताळणी करण्याचे ठरवले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 पवार यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.14 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हास रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 पवार असे माझे मो.सा. वरून तहसिल कार्यालय, तासगाव येथे जावून तलाठी मॅडम यांचा शोध घेतला असता त्या मिळून न आल्याने मी माझे मोबाईल वरुन तलाठी श्रीमती जाधव यांचे मो.क्र. 9600490825 यावर कॉल करून विचारणा केली असता तलाठी मॅडम यांनी त्या इलेक्शन रूममध्ये असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना बाहेर येणेची विनंती करून फोन कट केला. त्यानंतर तलाठी जाधव मॅडम हया रूम मधून बाहेर आल्याने मी त्यांची भेट घेवून माझे नोंदीबाबत त्यांचेशी चर्चा करून नोंद लवकर घालून देणेची विनंती केली. त्यावर तलाठी मॅडम यांनी माझी नोंद घालणेसाठी पंधरा ते वीस दिवस लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना "सकाळी बोलल्याल काय तर अॅडजस्ट करा की" असे म्हणालो असता तलाठी जाधव मॅडम यांनी "तीन ठिक हाय, त्यांना द्याव लागणार....त्यांना दोन द्याव लागणार....सर्कल मॅडमना" असे म्हणून स्वत: करीता व सर्कल मॅडम यांचेकरीता माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी तलाठी जाधव यांना "सर्कल मॅडमला विचारा नाहीतर परत मी पुढ गेल्यावर, परत काय आडचण" असे म्हणालो असता तलाठी जाधव यांनी "न्हाय, न्हाय काय न्हाय प्रॉब्लेम नाही, त्यांना मी निरोप दिलाय" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "किती मध्ये होईल ते....सर्कल मॅडमच किती म्हणला" असे विचारले असता तलाठी जाधव यांनी "त्यांच एक दोन हजार" असे म्हणाल्या.

त्यानंतर मी तलाठी जाधव यांना माझी नोंद लवकर मंजूर करण्याची विनंती केली असता तलाठी जाधव यांनी "कुणाची तक्रार वगैरे हाय काय?" असे विचारले असता मी त्यांना आम्ही भावा भावात जमिन घेतले असल्याचे सांगितले. त्यावेळी तलाठी जाधव यांनी मला "आत्ता किती आहेत तुमच्याकड पैसे, किती देवू शकता आत्ता तुम्ही" असे म्हणून लागलीच पैसे देण्यास सांगितले असता, मी त्यांना "आत्ता एटीएम मधून काढल पाहिजे" असे म्हणालो. त्यावर तलाठी जाधव यांनी "न्हाय... अर्जट काय लगेच काढत न्हायत मॅडम" असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना "मग संध्याकाळी देवू" असे विचारले असता तलाठी जाधव यांनी "द्या संध्याकाळी, दिल तर त्यांच्याकड द्या...पिंटू जवळ" असे म्हणून "आत्ता जमत असल तर आत्ता" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना आत्ता पैसे नसल्याचे सांगितले. त्यावर तलाठी जाधव यांनी मला "नाहीतर बघा एवढे जमले तर द्या" असे म्हणून हाताची तीन बोटे मला दाखविली. त्यावर मी त्यांना "किती तीनच" असे विचारले असता तलाठी जाधव यांनी "द्या असुदे तीनच....तीनच द्या" असे म्हणून माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी व पंच नं.1 असे तहसिल कार्यालयातून बाहेर येवून मोटार सायकलवर जात असताना मला तलाठी जाधव यांचा फोन आला. त्यावेळी मी त्यांचा फोन कॉल उचलून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी तलाठी जाधव यांनी "हाय काय, जरा वरती येता का?" असे म्हणाल्या असता मी त्यांना येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 पवार असे पुन्हा मो.सा. वरून तहसिल कार्यालय येथे जावून पहिल्या मजल्यावर तलाठी श्रीमती जाधव यांची भेट घेतली. त्यावेळी तलाठी जाधव यांनी मला "काय करा, त्यांना फक्त एवढेच द्या" असे म्हणून हाताची दोन बोटे दाखवून इशारा केला. त्यावर मी त्यांना "दोन हजार रूपये" असे म्हणालो असता तलाठी जाधव यांनी मला "आणि त्यांना सांगा की मॅडमकड राहीलेल दिलेत" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "पिंटूला काय सांगू" असे विचारले असता तलाठी जाधव यांनी "काय सांगू नका, फक्त सांगा मॅडमला दिलेत राहीलेल" असे म्हणाल्या. त्यानंतर मी व पंच नं.1 पवार असे मोटारसायकलवरून तहसिल कार्यालय तासगाव येथून रवाना होवून भिलारे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 राजू पवार यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिले लाच मागणीचे तक्रारी अर्जाचे अनुषंगाने भिलारे साहेबानी तलाठी श्रीमती जाधव यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, तलाठी श्रीमती जाधव यांनी मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद सातबारा सदरी धरणेकरीता स्वत: करीता व मंडल अधिकारी यांचेकरीता सुरवातीस माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती मंडल अधिकारी यांचेकरीता माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी तलाठी श्रीमती जाधव हया सर्कल मॅडम यांचे नावाने लाच मागणी करीत असल्याने तलाठी जाधव यांचे लाच मागणी कृत्यामध्ये सर्कल पाटोळे मॅडम यांचा सहभाग आहे अगर कसे? याची पडताळणी करण्याचे निश्चित केले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 पवार यांना तहसिल कार्यालय तासगाव येथे मंडल अधिकारी श्रीमती पाटोळे यांचेकडे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 पवार यांना पडताळणी कारवाईच्या अनुषगाने योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.19 वाजता सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हास रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 पवार असे माझे मो.सा. वरून तहसिल कार्यालय, तासगाव येथे जावून मंडल अधिकारी श्रीमती पाटोळे यांचा शोध घेतला असता त्या मिळून आल्या नाहीत. त्यानंतर मी कार्यालयातील एका महिलेला सर्कल पाटोळे यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी तहसिलदार साहेबांची मिटींग सुरू असल्याने त्या मिटींगमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 पवार असे तहसिल कार्यालयाचे मोकळया पॅसेजमध्ये बराच वेळ थांबून राहिलो. त्यावेळी तलाठी श्रीमती जाधव हया मला बघून तहसिल कार्यालयामधून निघून गेल्या.
त्यानंतर सुमारे दोन ते अडीच तासाने मिटींग संपल्याने मी सर्कल मॅडम यांची भेट घेवून त्यांना "सर्कल मॅडम नमस्ते" असे म्हणालो. त्यावर सर्कल मॅडम यांनी "बोला की" असे म्हणाल्या. त्यावर मी सर्कल मॅडम यांना माझे नोंदीचे काम लवकर करण्यास सांगितले असता त्यांनी मला नोंदीची मुदत ही एकविस दिवस असल्याचे सांगून नोंदीची मुदत झालेनंतर त्यांचे लॉगीनला नोंद आलेनंतर त्या नोंद मंजूर करीत असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना छत्तीसगड येथे नोकरीस असलेचे सांगून परत काही अडचण आली तर प्रॉब्लेम येईल असे सांगून नोंद लवकर मंजूर करण्यास सांगितले. त्यावर सर्कल मॅडम यांनी मला "एकविस तारखेनंतर मुदत संपल्यानंतर नोंद माझे लॉगीनला आलेनंतर नोंद मंजूर करून टाकते, काय अडचण येणार नाय" असे म्हणाल्या. त्यानंतर मी व पंच नं.1 असे तहसिल कार्यालय, तासगाव येथून रवाना होवून भिलारे साहेब व सापळा पथक थांबले ठिकाणी हजर झालो.
त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 राजू पवार यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, मंडल अधिकारी श्रीमती पाटोळे यांनी मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद मंजूर करीत असल्याचे सांगून माझेकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच तलाठी श्रीमती जाधव हया सर्कल पाटोळे यांचे नावाचा वापर करून माझेकडे लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तलाठी श्रीमती जाधव यांनी माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम खाजगी इसम, दादासो कोळी उर्फ पिंटु यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने भिलारे साहेब यांनी मला पिंटू कोळी यांचे ठाव-ठिकाण्याबाबत विचारणारा केली असता पिंटु कोळी हा कार्यालयीन वेळ संपली असल्याने तसेच तो दारूचा व्यसनी असल्याने त्याचा ठाव-ठिकाणा आता मिळणे शक्य नसल्याचे पंचांसमक्ष सांगितले.
त्यानंतर भिलारे साहेब यांनी सर्वानुमते खाजगी इसम, पिंटु उर्फ दादासो कोळी यांचेविरूध्द दि.12.02.2025 रोजी तलाठी कार्यालय, राजापूर येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून मला दि. 12.02.2025 रोजी 11.00 वा राजापूर येथे आलेनंतर संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या व झाले कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देऊन जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी निघुन गेलो.

दि. 12.02.2025 रोजी पाटील साहेब यांनी मला संपर्क करून बांबवडे फाटा येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यावेळी मी पाटील साहेब यांना थोडया वेळाने तेथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर 15.30 वा चे सुमारास मी पाटील साहेब, भिलारे साहेब व सापळा पथकाची बांबवडे फाटा येथे जावून भेट घेतली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसणेच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी मला दिले सुचने प्रमाणे लाच म्हणुन द्यावी लागणारी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 4 नोटा असे 2,000/- रुपये पंचा समक्ष हजर केले. भिलारे साहेबांनी सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर मी, दोन्ही पंच, श्री. भिलारे साहेब यांनी सही केली.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व भिलारे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवून, डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.23 वाजता सुरू करून माझे गळ्यामध्ये अडकवून मला व पंच नं.1 राजू पवार यांना रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 असे माझेकडील मो.सा.ने रवाना होवून तलाठी कार्यालय राजापूर येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ भिलारे साहेब सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने येवून तलाठी कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिले. त्यावेळी तलाठी कार्यालयास कुलूप



Scanned with OKEN Scanner

असल्याने मी माझे मोबाईलवरून दादासो कोळी उर्फ पिंटू याचे मो.क्र. 9284634294 वर कॉल केला असता त्याने माझे कॉल उचलला नाही.

त्यानंतर मी तलाठी कार्यालयाचे बाजूस असले गल्लीमधून चालत जावून पिंटू कोळी यांचे घराजवळ जावून घरातील एका महिलेस पिंटू याचेबाबत विचारणा करून त्यास फोन लावणेस सांगितले. त्यावेळी सदर महिलेने पिंटू यास फोन करून विचारणा केली. त्यावेळी सदर महिलेने मला पिंटू हा लक्ष्मी चौकात असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे गल्लीमधून चालत तलाठी कार्यालयाजवळ येवून थांबून राहिलो. काही वेळाने पिंटू कोळी व त्याचे सोबत एक इसम त्यांचेकडील मोटार सायकलने माझेजवळ आले. त्यावेळी पिंटू कोळी हा मोटार सायकलवरून उतरला व मो.सा. वरील इसम हा तेथून निघून गेला. त्यावेळी मी पिंटू कोळी यास "काल मॅडम बोलली होती....तलाठी मॅडम बोलली नव्हती का?" असे म्हणालो. त्यावर पिंटू याने "हा...राहुदे म्हणल काय" असे म्हणाला. त्यावर मी माझे उजवे खिश्यातील लाच रक्कम बाहेर काढून पिंटू यास "घ्या की" असे म्हणालो असता पिंटू याने "न्हाय, खरच नकोच म्हणल...मॅडमच म्हणल्या घेवूच नका म्हणल्या....तलाठी मॅडम" असे म्हणाला. त्यावर मी त्यास "घेतला असता तर विषय मिटला असता" असे म्हणालो. त्यावर पिंटू याने "न्हाय, न्हाय, नको म्हणल्यावर विषय संपला... सर्कल बी नको म्हणत्या आणि ते बी नको म्हणत्यात" असे म्हणाला. त्यावर मी त्यास "आडचण तर येणार नाही ना?" असे विचारले असता पिंटूने "आडचणीचा काय विषय न्हाय ओ, आत्ता काय सात बारा तुम्हाला मिळणार... अडचणीचा काय विषयच राहीला न्हाय...आठरा दिवस पुर्ण झाली कणी तुम्हाला सात बारा नावावर झालाच.. अडचणीचा काय विषयच येत न्हाय" असे म्हणाला. त्यावर मी पुन्हा त्यास "बघा बाबा, परत न्हायतर...घ्या लागच विनाकारण" असे म्हणालो असता पिंटू याने "न्हाय, न्हाय, न्हाय, त्यांनी सरळ सांगितल म्हणल विषय संपला" असे म्हणून दादासो कोळी उर्फ पिंटू हा चालत निघून गेला. त्यानंतर मी व तक्रारदार असे तेथून मोटारसायकलवर रवाना होवून राजापूर गावाजवळील पाण्याचे टाकीजवळ दाखल झालो. भिलारे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने माझे पाठोपाठ आले. भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 राजू पवार यांना सापळा कारवाईची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत सापळा कारवाई मध्ये, खाजगी इसम, दादासो कोळी उर्फ पिंटू यांनी मला तलाठी जाधव मॅडम यांनी माझेकडून पैसे न घेण्यास सांगितले असल्याने दादासो कोळी उर्फ पिंटू यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारली नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही राजापूर येथून रवाना होवून बांबवडे फाटा येथे दाखल झालो. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला सदर कारवाई बाबत गोपनियता राखणे बाबत सुचना दिल्या. तसेच तलाठी जाधव अगर पिंटू कोळी यांचा निरोप आल्यास त्यांचेशी संपर्क साधणे बाबत सुचना दिल्या. त्यावेळी मी भिलारे साहेबांना पंचांसमक्ष सांगितले की, "तलाठी जाधव मॅडम यांनी दादासो कोळी उर्फ पिंटू यास माझेकडून पैसे न घेण्यास सांगितले असल्याने दादासो कोळी उर्फ पिंटू हा आता माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री आहे. तसेच श्रीमती सुजाता जाधव, तलाठी राजापूर यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी धरण्यासाठी सुरवातीस स्वत: करीता व सर्कल यांचेकरीता माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती सर्कल यांचे नावाने स्वत: करीता माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तरी श्रीमती सुजाता जाधव, तलाठी राजापूर यांचेवर कारवाई व्हावी" असे सांगितले. भिलारे साहेब यांनी तसा माझा लेखी जबाब दोन्ही पंचांसमक्ष नोंदविला आहे.

तलाठी श्रीमती सुजाता जाधव, तलाठी राजापूर यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी धरण्यासाठी सुरवातीस स्वत: करीता व सर्कल यांचेकरीता माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती सर्कल यांचे नावाने स्वत: करीता माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली असून लाच रक्कम ही खाजगी इसम, दादासो कोळी उर्फ पिंटु यांचेकडे देण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच दि.12.02.2025 रोजीचे सापळा कारवाईमध्ये खाजगी इसम, दादासो कोळी उर्फ पिंटु यांनी मला तलाठी जाधव मॅडम यांनी माझेकडून पैसे न घेण्यास सांगितले असल्याने दादासो कोळी उर्फ पिंटु यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारली नाही.

तरी दि. 11.02.2025 रोजी 15.14 वा ते 15.40 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती सुजाता आण्णाप्पा जाधव, तलाठी राजापूर वर्ग-3 ता. तासगाव जि.सांगली यांनी तहसिल कार्यालय तासगाव येथील निवडणुक शाखेच्या बाहेर मोकळ्या पॅसेजमध्ये आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने मी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद 7/12 सदरी धरण्यासाठी सुरवातीस स्वत: करीता व सर्कल यांचेकरीता माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती सर्कल यांचे नावाने स्वत: करीता माझेकडे 2,000/- रूपये



Scanned with OKEN Scanner

लाचेची मागणी केली असल्याने माझी लोकसेविका श्रीमती सुजाता जाधव, तलाठी राजापूर वर्ग-3 ता. तासगाव जि. सांगली यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील वर्दी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंटआउट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Avinash rangnath ghorpade
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस स्टेशन ऑफिसर
तासगांव पोलीस ठाणे.



Scanned with OKEN Scanner

Name (नाव): SOMNATH VASANT V
Rank(पद): PI (Inspector)
No.(सं.): 15101000402SVWM82(

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ चा जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner